दैनिक
# दामाजी एक्सप्रेस
MAH/MAR/2012/41504



# जनता विद्यालय जुनियर कॉलेज येथे सायबर क्राईम विषयी मार्गदर्शन

टेंभुर्णी (प्रतिनिधी) : जनता विद्यालय येथे सायबर क्राईम विषयी मार्गदर्शन करण्यात आले. तसेच सखी सावित्री यांची बैठक पार पडली. विद्यार्थ्यांना सायबर क्राईम विषयी माहिती व्हावी यासाठी महाराष्ट्र पोलीस यांनी एक प्रकल्प हाती घेऊन त्या प्रकल्पानुसार पुणे येथील प्रतिभा कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी श्रावणी सावंत व मानसी वाडेकर यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सविता जगताप यांनी केले आभार प्रदर्शन गणेश माढेकर यांनी केले. यावेळी सखी सावित्री समितीच्या अध्यक्षा दैवशीला जाधव, माता पालक शिक्षक संघाच्या उपाध्यक्षा जोशना शिवाजी चोपडे, सहसचिवा रत्नमाला जोरे तसेच सर्व माता पालक सदस्या व सर्व शिक्षिका उपस्थित होत्या.